विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत/जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी योजनांची जाहिरात व प्रसिध्दी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग

शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१९/प्र.क्र.९७/महामंडळे

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ ऑगस्ट, २०१९

वाचा : १) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र. इमाव-२०१९/प्र.क्र.११/महामंडळे, दि.२८.१.२०१९

२) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र. वनाम-२०१७/प्र.क्र.८७/महामंडळे, दि.२८.१.२०१९

३) शासन निर्णय, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, क्र. इमाव-२०१८/प्र.क्र.९०/महामंडळे, दि.२८.१.२०१९

४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दि.२५.६.२०१९

प्रस्तावना :

सामान्य प्रशासन विभागाच्या दि.९.३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाची स्थापना करण्यात आली असुन या विभागामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गाकरीता विविध योजना राबविण्यात येत आहेत. तसेच, संदर्भाधिन क्र. ४ येथील शासन निर्णयाप्रमाणे सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग कल्याण हा विषय या विभागाकडे वर्ग करण्यात आला असुन सदर प्रवर्गाकरीता तसेच मा. मंत्रिमंडळाच्या दि.३०.७.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीसाठी सुरु असलेल्या योजनांच्या धर्तीवर धनगर समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबविण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु आहे. वरील सर्व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना/जनतेला मिळावा यासाठी सदर योजनांची माहिती लाभार्थ्यांपर्यंत/जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी योजनांची जाहिरात व प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. तथापि, योजनांची जाहिरात व प्रसिध्दीकरीता सद्य:स्थितीत विभागाकडे तरतुद उपलब्ध नसल्याने विभागाच्या योजनांची जाहिरात व प्रसिध्दी या विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत तसेच सदर महामंडळाकडे असलेल्या तरतुदीमधून प्रतिपूर्तीच्या अधिन करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

शासन निर्णय :

विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जाहिरात व प्रसिध्दी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

याकरीता महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळास रुपये १०.०० कोटी (रुपये दहा कोटी) इतका खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

तसेच, याकरीता, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत करण्यात येणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती, या विभागाच्या -२२५११३२५॰ या लेखाशिर्षांतर्गत, ॰२६, जाहिरात व प्रसिध्दी॰ खाली तरतुद उपलब्ध झाल्यानंतर महामंडळास करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाने विभागाच्या विविध योजनांची जाहिरात व प्रसिध्दी करण्याची कार्यवाही शासनाशी विचार विनिमय करुन तसेच शासनाच्या मान्यतेने / धोरणाप्रमाणे करावी.

सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.४४९/व्यय-१४, दि.२.८.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०८०६१०५५३३८५२२ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.08.06 11:06:52 +05'30'

(रविन्द्र गुरव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री/मा.राज्यमंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विधान परिषद/विधानसभा सदस्य, विधानभवन, मुंबई
६) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. प्रधान सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८) मा. प्रधान सचिव (नियोजन/वित्त), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१०) आयुक्त,समाजकल्याण,महाराष्ट्र राज्य,पुणे.
११) संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१२) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेय/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर.
१३) सर्व सह सचिव/उप सचिव/कक्ष अधिकारी , विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,मुंबई
१५) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या.,मुंबई
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) निवडनस्ती